| नियमित दिवाणी दावा क्र.९९४/२०२१ मधील<br>निशाणी क्र.३४ खालील आदेश<br>(भाउसाहेब कर्डीले विरुध्द अशोक कर्डीले व इतर ) | |
|---|---|

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर माफ होवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, महत्त्वाची व जुनी कागदपत्रे वेळेत उपलब्ध होवू शकले नाही. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर न आल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल. सबब, झालेला उशीर माफ होवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी.

३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले. वादीने कथन केले आहे की, अर्जातील मजकूर खरा व कायदेशीर नाही. झालेल्या उशिराबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब, दंड रक्कम रूपये पाच हजार आकारण्यात यावा.

४. उभयतांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. सदरचा अर्ज वाचला. प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत दावा हा दावा जाहिर ठरावाकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी दोघांचेही हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे दावा पुर्णतः निकाली

काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादीला त्याची कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांना प्रस्तुत दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर दंडासह माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२. प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड ने वादीला दंडापोटी रक्कम रुपये ८००/–(रक्कम रुपये आठशे फक्त)पुढील तारीख किंवा तत्पूर्वी दयावेत. तद्नंतर प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

सही/–

(**श्रीमती संध्या यु. सुळ**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण – नेवासा
दिनांक – २५/०६/२०२५